www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २७६ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१५ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### बाहेर बोलता तेवढे कॅबिनेटमध्ये बोलला असतात

**मुंबई–**भुजबळसाहेब आपणही बाहेर जेवढे विरोधात बोलता; तेवढेच कॅबिनेटमध्ये बोलले असते अन् कॅबिनेट ला निर्णय घ्यायला लावला असता ती आपल्यात क्षमता आहे किंवा मंत्रिपदाचा राजीनामा दिला असता तर लोकांच्या प्रश्नावर लढणारा नेता म्हणून म्हणून आपली ख्याती आहे ती अजुन वृंधिंगत झाली असती असा टोला राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंत्री छगन भुजबळ यांना लगावला आहे. बारामतीमध्ये रविवारी अजित पवार गटाची सभा झाली. यामध्ये भुजबळ यांनी मराठा आरक्षणावरून शरद पवार यांच्यावर गंभीर आरोप केले होते.भुजबळ यांच्या याच आरोपांना आव्हाड यांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिले आहे. ''भुजबळसाहेब तुम्ही आदरणीय पवारसाहेबांबाबत केलेले वक्तव्य आम्ही सर्वांनीच ऐकले. गेली दोन वर्षे राज्यातील शिंदे फडणवीस सरकार आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वच बाजूंना केवळ खेळवत आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वपक्षीय बैठका घ्यायच्या मात्र अंतिम तोडगा काहीच काढायचा नाही, चर्चांमधे सर्वांना गुंतवून ठेवून या प्रश्नांचे घोंगडे भिजत ठेवायचे, हिच या सरकारची रणनीती आहे. परवाची आरक्षण विषयक सर्वपक्षीय बैठक हा देखील सरकारचा त्यापैकीच एक प्रकार होता'', असे आव्हाड म्हणाले.

### राज्यात पावसाचा जोर वाढणार


**मुंबई–**राज्यात सर्वत्र सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. आज कोकण आणि घाटमाथ्यासह, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड आणि रत्नागिरीमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबईमध्येही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. राज्यात पावसाचा जोर वाढणार आहे.हवामान विभागाने राज्यात आज जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. अनेक ठिकाणी रविवारी पावसाने हजेरी लावली आहे. त्यातच आज रत्नागिरी आणि रायगडमध्ये मुसळधार पावसाचा रेड अलर्ट आहे. तर सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर, परभणी, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, वर्धामध्ये जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. याशिवाय पालघर, ठाणे, मुंबई, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजी, धाराशिव, नांदेड, बुलडाणा, अकोला, वाशीम, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये जोरदार पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, नगर, जालना, बीड, नागपूर, भंडारा, गोंदियामध्ये विजांसह पावसाचा अंदाज आहे.

### मोदींनी केवळ महाराष्ट्रात मिंधे उद्योग आणला

**मुंबई–**मोदी यांनी दहा वर्षांत महाराष्ट्राची आर्थिक ताकद मोडून काढली व रोजगार नष्ट केला. नाणार रिफायनरी, वाढवणसारखे विषारी प्रकल्प आणून मोदी महाराष्ट्रात रोजगार देण्याच्या वल्गना करीत असतील तर ते महाराष्ट्राच्या जनतेला मृत्यूच्या खाईत ढकलत आहेत. मोरारजी देसाई यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढय़ात मराठी माणसांना थेट गोळय़ा घातल्या. मोदी विषात साखर पेरून महाराष्ट्राला मारीत आहेत. यांना मोरारजी मोदी असेच म्हणावे लागेल! अशी बोचरी टीका ठाकरे गटाने आज मुखपत्रातून केली आहे. ठाकरे गटाने आज पंतप्रधान मोदी यांना लक्ष केले आहे.''पंतप्रधान मोदी यांनी घोषणा केली की, आपण महाराष्ट्राला शक्तिशाली व मुंबईला जगाची आर्थिक राजधानी बनवणार आहोत. मोदी यांना कोणीतरी सांगायला हवे की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच व दिल्लीत मोदी–शहांचे राज्य आले नसते तर मुंबई जगाचीही आर्थिक राजधानी नक्कीच झाली असती. गेल्या दहा वर्षांत गुजरातच्या हितासाठी मुंबईला ज्या पद्धतीने ओरबाडले गेले किंवा लचके तोडले, त्यामुळे मुंबई घायाळ झाली आहे. मुंबई विव्हळत पडली आहे. मोदी हे राजकीय थापेबाजी करण्यात पटाईत आहेत'', असे भाष्य ठाकरे गटाने केले आहे.तसेच मोदी साहेबांनी असा दावा केला आहे की, महाराष्ट्राला जगातील मोठे आर्थिक शक्तिस्थान आणि जगातील फिनटेक राजधानी बनवणे हे त्यांचे ध्येय आहे.

# बारामतीकरांनो भावनिक होऊ नका ;जनसन्मान रॅलीतून अजित पवारांचा विरोधकांवर निशाणा

## हौशे, नवसे, गवसे येतील अन् खोटं नरेटिव्ह पसरवतील






**बारामती (वृत्तसंस्था)–**बारामतीकरांनो भावनिक होऊ नका, विकासाचे राजकारण करायला शिका, भावनिकतेने विकास होत नसतो, ही बाब गंभीरतेने समजून घ्या, लोकसभेत चुकीच्या पद्धतीने तुम्हाला सांगितले गेले. पण तुम्हाला मी सांगतो, विधानसभेत देखील काही हौसे, नवसे अन् गवसे येतील अन् खोटं नरेटिव्ह पसरवतील, पण तुम्ही त्याला बळी पडू नका, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर निशाणा साधला. तर शरद पवार, सुप्रिया सुळे व युगेंद्र पवारांवर देखील नाव न घेता टोला लगावला.

लोकसभेला आलेल्या अपयशानंतर आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाला उभारी देण्याच्या दृष्टीनं राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रणनीती आखली आहे. त्यापार्श्वभूमीवर आज बारामतीमधून 'जनसन्मान रॅली' या काढण्यात आली. यावेळी व्यासपिठावर खा. सुनेत्रा पवार, मंत्री छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.पवार म्हणाले, अडीच




लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या सर्व महिलांना 'लाडकी बहिण योजने'चा फायदा मिळणार आहे. तीन गॅस सिलेंडरचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा होणार आहेत. बारामतीतील महिलांना 'लाडकी बहीण योजने'साठी वर्षाला १८० कोटी रूपये मिळणार आहेत. महाराष्ट्रात 'लाडकी बहीण योजने'साठी ४६ हजार कोटी रूपये मिळणार आहेत. काही–काही राज्यांचे बजेट एवढे नाहीत, पण महायुतीचे सरकार हे लोकांचे सरकार आहे, प्रत्येकाला येथे न्याय दिला जाईल, असेही अजित पवार म्हणाले.

महिला सक्षम आणि आत्मनिर्भर होण्यासाठी 'लाडकी बहीण योजने'तून वर्षाला १८ हजार रूपये देण्याचं काम महायुती सरकारने केले आहे. पण, त्यासाठी विधानसभा निवडणुकीत महायुतीला निवडून द्यायचं आहे. तर, 'लाडकी बहीण योजना' पुढे चालणार आहे. हौशे, नवशे, गवशे येतील, काही सांगण्याचा प्रयत्न करतील, विश्वास ठेवून नका. हा अजितदादा शब्दांचा पक्का आहे. त्यात कुठेही बदलणार नाही, असं अजित पवार यांनी म्हटलं.४४ लाख शेतकऱ्यांचे १४ हजार कोटी माफ केले आहेत. महावितरणचे कोणताही अधिकारी वीज बिल भरा म्हणून सांगण्यास येणार नाही. पीक, धान्य, फळे चांगल्या प्रकारे पिकवा. १ रूपये सरकार पिकविमा देत आहे. शेतकऱ्यांसाठी शून्य टक्के व्याजानं पिककर्ज सरकारनं दिलं आहे, असं अजित पवार यांनी सांगितलं.

# डॉ.आंबेडकर सब्जी मंडी मध्ये गावगुंडांची हप्ता वसुली

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सब्जी मंडी मध्ये येऊन काही गुंड प्रवृत्तीचे लोक व्यवसायाच्या वेळेवर गुंडागर्दी करतात. हफ्ता मागतात न दिल्यास मारहाण करतात. मालाची फेकाफेक करतात. त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी व्यापारी व शेतकऱ्यांनी केली आहे.

आम्हाला हप्ता द्या नाहीतर आम्ही मार्केटमध्ये धिंगाणा घालू अशी दमदाटी करून भाजी व्यापारी व शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या गावागुंडामुळे त्रस्त झालेल्या व्यापारांनी पोलिसात तक्रार करून गुंडाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली असुन काही अनुचित घटना घडल्यास त्यास प्रशासन जवाबदार राहील, असे सांगितले आहे.सकाळी दलाली बाजार सुरु असताना शिवीगाळ करत हे गुंड येतात. पैसे मागतात दुकानातून ते काही पण उचलून घेऊन जातात. कास्तकार भाजी पाला घेऊन येतात. त्यांना सुद्धा हे गावगुंड त्रास देतात. दिनांक १३जुलै शनिवार ला सकाळी नऊ–साडेनऊच्या दरम्यान सुनील गावंडे यांच्या दुकानात येऊन या गावगुंडांनी दुकानात आम्हाला हप्ता दे नाहीतर तुला संपून टाकेल, अशी धमकी दिली.आणि अर्वाच्यशिविगाळ केली. हप्ता देण्यास मनाई केली असता त्या गावगुंडांनी त्यांचा पैशाचा गल्ला हिसकण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या दुकानातील टोपले घेऊन त्यांच्यावर हमला करण्याचा प्रयत्न केला. सब्जी मंडीतील व्यापारी या गावगुंडांनी खूप त्रस्त झालेले आहेत.हे गावगुंड सकाळी मंडी सुरू झाली की येऊन स्वतःच्या हाताने भाजीपाला घेऊन थैले भरतात. शेतकरी गाव खेड्यातून येऊन मंडी मध्ये भाजी पाला घेऊन येतात आणि हे गाव गुंड शेतकरी व व्यापारी लोकांना त्रास देतात. दि. १३ ला झालेले कृत्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झालेले आहे. व्यापाऱ्यांची व शेतकरी लोकांची इच्छा आहे की या गावगुंडांचा ताबडतोब बंदोबस्त करावा. यांची हिंमत दिवसांनी दिवस वाढत आहे. यांचा बंदोबस्त करावा. अन्यथा रागापोटी काहीही अनुचित प्रकार घडल्यास त्यास प्रशासन जवाबदार राहील, असा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.

# पन्नेमारा गावातील रस्ते दुरुस्त करा सरपंच-शेवंता हलामी यांची मागणी

## मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांना निवेदन




**धानोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मुरूमगाव परिसरातील पन्नेमारा ग्रामपंचायतअतंर्गत विविध समस्या दूर करा याबाबतचे निवेदन तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष तथा पन्नेमाराच्या सरपंच शेवंता हलामी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे.रिडवाही ते उमरपाल, केहकावाही ते मसाद तसेच पन्नेमारा ते बेलगाव– सिर्देसूर रस्त्याचे डांबरीकरण करावे. मरारटोला व होचेटोला या गावातील नवीन पुलाचे बांधकाम करावे. रस्ते व पूल नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याकरिता निधी मंजूर करण्याची मागणी सरपंच शेवंता हलामी यांनी केली आहे.

## आज तळोधी बंद तळोधीकर घालणार देवाला साकडे

**नागभीड । प्रतिनिधी**

निसर्गाच्या अवकृपेमुळे तळोधी व परिसरात शेतातील रोवन्याची काम ठप्प झालें आहे त्यामुळे लोकांना रोजगार मिळणे दुरापास्त झाले आहे. निसर्गाला मनवण्यासाठी उद्या दिनांक १५ जुलै २०२४ सोमवारला तळोधी ग्रामपंचायत च्या वतीने सर्व दुकाने, व्यवसाय ,शेतीचे काम बंद करून गावातील प्रत्येक वार्डात पूजा अर्चा चालणार असून गावातील सर्व लोक भजन पूजन करून प्रत्येक मंदिर माता मंदिर येथे देवाला साकडे घालणार आहे त्यामुळे उद्या सर्व व्यावसायिक प्रतिष्ठाने दुकाने गाड्या घोड्या सर्व कामधंदे बंद करून पूजेमध्ये नागरिकांनी सामील व्हावे असे आवाहन ग्रामपंचायत तर्फे करण्यात केले आहे.

## विमल गुलाबराव धोपाडे यांचे निधन



**पुलगाव (प्रतिनिधी)–**येथील निवृत्त शिक्षिका विमल गुलाबराव धोपाडे (वय ९२) यांचे १३ जुलै ला अल्प आजाराने दुःखद निधन झाले. दि १४ जुलै रोजी गंगाबाई घाट , नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे, भाऊ, ३ मुले, सुना, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# दारू पिऊन शिक्षक पोहोचला शाळेत ; जि.प. उच्च प्राथमिक केंद्र शाळा कसनसूर येथील प्रकार

## शाळा व्यवस्थापन समितीने घेतली दखल

**आनंद दहागावकर । गडचिरोली**

शिक्षकाला गुरुचा दर्जा तर शाळांना विद्या मंदिर म्हटले जाते. अशा पवित्रस्थळी विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा शिक्षकच जर दारू पिऊन शाळेत येत असेल तर विद्यार्थ्यांवर काय संस्कार होणार? असाच प्रकार शुक्रवारी (दि. १२) एटापल्ली तालुक्यातील कसनसूर जि.प उच्च प्राथमिक केंद्र शाळेत उघडकीस आला. येथील एक शिक्षक दारूच्या नशेत शाळेत पोहोचला. याची तक्रार सरपंच व शाळा समितीने जि.प. सीईओ आयुषी सिंह यांच्याकडे केली. सीईओंनी तक्रारीची गंभीरतेने दखल घेत शिक्षकाला तत्काळ निलंबित केले. जीवनदास गोमा आत्राम, असे निलंबित शिक्षकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, कसनसूर येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते सातवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. या शाळेत अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेत जीवनदास आत्राम नावाचे शिक्षक कार्यरत आहेत. शुक्रवारी शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षक आत्राम दारूच्या नशेत शाळेत पोहोचले. या प्रकरणाची माहिती मिळताच शाळा व्यवस्थापन समितीचे अधिकारीही शाळेत पोहोचले. दारू पिऊन शाळेत येणाऱ्या शिक्षक आत्राम यांना विचारणा





केली असता, त्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी थेट सरपंचामार्फत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांना फोन करून या प्रकरणाची माहिती दिली. सीईओ सिंह यांनी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना कसनसूरच्या जि.प. शाळेत चौकशीसाठी पाठवले. अधिकाऱ्यांना शिक्षक आत्राम दारूच्या नशेत आढळून आले. सीईओ आयुषी सिंह यांनी दखल घेत शिक्षकाला तत्काळ निलंबित केले.

> **"शाळेतील विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकाची असते. त्याचबरोबर शिक्षकांच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडते. मात्र दारूच्या नशेत शाळा गाठून एखाद्या शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केल्यास ते अजिबात खपवून घेतले जाणार नाही.**
> **– आयुषी सिंह, सीईओ जि. प. गडचिरोली.**

# रोजगारक्षम बनवाल, पण रोजगार उपलब्ध आहे कोठे?

**केंद्र व महाराष्ट्र राज्याच्या राजधानीपासून शेकडो कोस दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मागास व गरीब कुटुंबातील युवावर्गास असले कौशल्य विकास भकासच करणारे ठरत आहे. कारण येथील तरुणाई स्वबळावर किंवा स्वतःचे भांडवल जमवून उद्योग सुरू करू शकत नाही. जरी बँककर्ज काढून किंवा शासनाच्या अनुदानाच्या भरवशावर उद्योग थाटलाही, तरी मात्र त्याची ती दुकानदारी अल्पावधीतच गारद होईल. विचारा तर खरं, का बरं? म्हणून... अहो, येथे त्या योग्य ग्राहकसंख्याच बोटावर मोजण्याइतकी आहे, मग काय माशा मारणार की काय? हे फक्त सुशिक्षित बेरोजगारांच्या जखमांवर मीठ चोळल्यासारखे झाले. हीच तर खरी अडचण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांत कर्मचाऱ्यांच्या रिक्तपदांचा उत्तुंग डोंगर उंचच उंच वाढतच आहे. त्यात भरतीप्रक्रिया राबविल्यास कित्ती बरे होईल, बिच्चारी मागास भागातील सुशिक्षित बेरोजगार तरूणाई पोटापाण्याला लागेल. काही पदांची भरती घेतल्या जाते, मात्र मंत्री, पदाधिकारी व अधिकारी टेबलाखालूनच्या वशिलेबाजीला प्रथम स्थान देतात. त्यातही बिच्चारा हा भुकेकंगाल युवावर्ग मागे पडतो, हीच आजची फार मोठी शोकांतिका! अशी प्रेरक माहिती श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींच्या या लेखातून वाचाच... संपादक.**

दरवर्षी साजरा होणारा जागतिक युवा कौशल्य दिन तरुणांना रोजगारासाठी, उद्योजकता बनण्यासाठी प्रोत्साहन देतो. तो तरूणाईच्या अंगी असावे लागणारे कौशल्य सुसज्ज करण्याच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित करतो. स्किल इंडिया मिशन देखील याच दिवशी सुरू करण्यात आले आहे. जागतिक युवा कौशल्य दिवस हा तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षणाचे महत्त्व, स्थानिक आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे. या संबंधित कौशल्यासह इतर कौशल्यांच्या विकासाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस १५ जुलै रोजी साजरा केला जातो. तरुणांना रोजगार, योग्य काम आणि उद्योजकता या कौशल्यांनी सुसज्ज करणे गरजेचे आहे. हा दिवस वर्तमान आणि भविष्यातील जागतिक आव्हाने सोडविण्यासाठी कुशल तरुणांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर देखील प्रकाश टाकतो. हा दिवस तरूणामधील संवाद, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षण संस्था, कंपन्या, नियोक्ते इत्यादींसाठी एक खास संधी प्रदान करतो. भारतातील स्किल इंडिया मिशन देखील या दिवशी सुरू करण्यात आले आहे. स्किल इंडिया हा केंद्र सरकारचा एक पुढाकार आहे, जो युवा कौशल्याचे सबलीकरण करण्यासाठी व त्यांना अधिक रोजगारक्षम बनवण्यासाठी सुरू केलेला आहे. पण रोजगार कुठे आहे हो? संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना- युनेस्को यांनी जाहीर केलेल्या एका आकडेवारीनुसार जगातील ७० टक्के विद्यार्थी लॉकडाउनमुळे वाईट रीतीने प्रभावित झाले आहेत. अनेक विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण सुरु झाल्यामुळे साधनांच्या अभावाने शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. कोविड-१९ या साथीच्या आजारामुळे सद्या ६ पैकी १हून अधिक तरुण कामावर जात नाहीत. अशावेळी जेव्हा तरुणांना रिकव्हरीच्या प्रयत्नास हातभार लावण्याचे आवाहन केले जाते, तेव्हा त्यांना पुढे असलेल्या आव्हानांना यशस्वीरित्या बाजूला करण्यासाठी त्यांना कौशल्यांनी सुसज्ज



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

करणे आवश्यक आहे. जीवघेण्या कोरोना महामारीनंतर युवा कौशल्यावर नवीन विचार करणे गरजेचे आहे.

डिसेंबर २०१४मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ठराव स्वीकारून १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. आजच्या तरूणांसाठी बेरोजगारी आणि रोजगाराच्या आव्हानांच्या बाबतीत अधिक चांगली सामाजिक-आर्थिक परिस्थिती प्राप्त करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सन २०२० साली रोटरी क्लब ऑफ बॉम्बेतर्फे प्रशिक्षणार्थींना मोबाईल टॅबलेट वितरणाचा ई-शुभारंभ केला होता. महाराष्ट्रामध्ये दरवर्षी जागतिक युवा कौशल्य दिन- वर्ल्ड युथ स्किल्स डे साजरा करण्यात येत असतो. त्यावेळी विविध ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. सर्वात महत्वाचे म्हणजे दोन वर्षांपूर्वी या दिवसाचे औचित्य साधून सलाम बॉम्बे फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बेच्या वतीने प्रशिक्षणार्थींना मोबाईल टॅबलेट वितरणाचा ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला होता. त्याचबरोबर स्किल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या वतीने ऑनलाईन वेबिनार तसेच कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत फेसबुक आणि युट्यूब लाईव्हद्वारे राज्यभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला होता. कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांना विविध कौशल्य प्रशिक्षणे ऑनलाईन साधनांच्या आधारे देण्याचा मानस त्यावेळी कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक साहेब यांनी व्यक्त केला होता. सलाम बॉम्बे फाऊंडेशनमार्फत गरीब विद्यार्थी आणि बेरोजगार तरुणांसाठी ब्युटी आणि वेलनेस, विविध घरगुती उपयोगाच्या वस्तुंची दुरुस्ती, मोबाईल रिपेरिंग, बेकरी उत्पादने, ज्वेलरी डिझाईन, माध्यमे, करमणूक आणि क्रीडाविषयक अशी विविध कौशल्य प्रशिक्षणे दिली जातात. काळवेळ पाहून विद्यार्थ्यांना ही प्रशिक्षणे ऑनलाईन दिली जातात. या प्रशिक्षणासाठी ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल फोन नाही, अशा विद्यार्थ्यांना मदत व्हावी; यासाठी रोटरी क्लब ऑफ बॉम्बेमार्फत विद्यार्थ्यांना टॅबलेट देण्यात येतात. यासोबतच सांगली येथील स्किल डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्यामार्फत राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वेबिनार संपन्न झाला. दुपारी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत झालेल्या फेसबुक आणि युट्यूब लाईव्हमध्ये प्रशिक्षणार्थी व संस्थांचा ऑनलाईन गौरव करण्यात आला होता.




२१व्या शतकातील तरुणांसाठी बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या आहे. सन २०२०च्या ग्लोबल एम्प्लॉयमेंट ट्रेंड्सच्या अहवालानुसार नोकरी नसलेल्या किंवा प्रशिक्षित नसलेल्या तरुणांची आकडेवारी वाढली आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता आता राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन रोजगार मेळावे घेण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांचा याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्यात एकही तरुण कौशल्य प्रशिक्षणाशिवाय किंवा रोजगाराशिवाय राहणार नाही यासाठी कौशल्य विकास विभाग व्यापक कार्य करेल, असे श्री मलिक म्हणाले. तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली आरोग्य कर्मचाऱ्यांची चुगरज लक्षात घेता यासंदर्भातील कौशल्य प्रशिक्षणावर यापुढील काळात अधिक भर देण्यात येईल, असेही मंत्री श्री.मलिक साहेब यांनी त्यावेळी सांगितले होते. शासकीय आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रवेशापासून तर तेथील ट्रेड परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मिळणाऱ्या कर्जापर्यंत विविध सवलती देण्यात येतात. याउलट राज्यातील अशासकीय आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कापासून उत्तीर्ण होऊनही कोणत्याही सवलती मिळत नाहीत. परिणामी एकाच प्रकारचे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या दोन गटांत समतोल साधला जाणार कसा? असा सवाल शेवटी उपस्थित होतोच. त्यामुळे सदरील सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा एकसमान विचार करून शासनाने या धोरणावर पुनर्विचार केला पाहिजे, अशी कुजबूज समाजातून ऐकू येत आहे. केंद्र व महाराष्ट्र राज्याच्या राजधानीपासून शेकडो कोस दूर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मागास व गरीब कुटुंबातील युवावर्गास असले कौशल्य विकास भकासच करणारे ठरत आहे. कारण येथील तरुणाई स्वबळावर किंवा स्वतःचे भांडवल जमवून उद्योग सुरू करू शकत नाही. जरी बँककर्ज काढून किंवा शासनाच्या अनुदानाच्या भरवशावर उद्योग थाटलाही, तरी मात्र त्याची ती दुकानदारी अल्पावधीतच गारद होईल. विचारा तर खरं, का बरं? म्हणून... अहो, येथे त्या योग्य ग्राहकसंख्याच बोटावर मोजण्याइतकी आहे, मग काय माशा मारणार की काय? हीच तर खरी अडचण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांत कर्मचाऱ्यांच्या रिक्तपदांचा उत्तुंग डोंगर उंचच उंच वाढतच आहे. त्यात भरतीप्रक्रिया राबविल्यास कित्ती बरे होईल, बिच्चारी मागास भागातील सुशिक्षित बेरोजगार तरूणाई पोटापाण्याला लागेल. काही पदांची भरती घेतल्या जाते, मात्र मंत्री, पदाधिकारी व अधिकारी टेबलाखालूनच्या वशिलेबाजीला प्रथम स्थान देतात. त्यातही बिच्चारा हा भुकेकंगाल युवावर्ग मागे पडतो, हीच आजची फार मोठी शोकांतिका!

!! आंतरराष्ट्रीय युवा कौशल्य दिनाच्या संपूर्ण तरूणाईस हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# शेताच्या बांधाची ओळख देणे काळाची गरज!



विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेताच्या बांधावर नेऊन शेतीची ओळख, प्रत्यक्ष अनुभव देण्याचा स्तुत्य उपक्रम संस्कार व्हॅली इंटरनॅशनल स्कूलने दाखविला ही बातमी समाधान देणारी आहे. खरं तर शेतीकडे दुर्लक्ष होत आहे, कित्येकांनी विशेषता कोकणात शेती करण्याचे प्रमाण एक तर कमी होतेय किंवा सोडून दिली जात आहे हे कटू सत्य नाकारता येणार नाही, कारणे अनेक आहेत. एक काळ असा होता की कोकणात प्राथमिक जिल्हा परिषद शाळेची शेतकी शाळा म्हणून ओळख असायची, विद्यार्थ्यांना शेतीविषयक प्रत्यक्ष प्रशिक्षण, प्रात्यक्षिक दिले जायचे, करून घेतले जायचे आता तेही राहिले नाही, या पार्श्वभूमीवर संस्कार व्हॅली इंटरनॅशनल स्कूल तर्फे राबवलेला उपक्रम लक्षणीय, अनुकरणीय वाटतो. पूर्वी एक म्हण म्हटली जायची, उत्तम शेती, दुय्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी आता पार उलट झालय. खरं तर शेती ही काळाची गरज असून शालेय शिक्षणातच शेतीची ओळख, अनुभव आणि आवड निर्माण होणे हे सुद्धा काळाची गरज आहे आणि म्हणूनच शेती विषय शहरी, ग्रामीण भागातील शाळा, कॉलेज मध्ये ठेवला जावा. भविष्याचा वेध घेता विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्याला शेतीच्या बांधावर नेण्याचे काम शाळांनी आवश्यक करणे गरजेचे वाटते.

**-विश्वनाथ पंडित**
**ठाणे**

## मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना

# नागरी क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणीसाठी महिला व बालकल्याण अधिकारी बारा तालुक्यांच्या भेटीवर

**गडचिरोली**-महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुंटुबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शासनामार्फत मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेची नागरी क्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता तसेच मदत केंद्रांचे कामकाजांची पाहणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाद्वारे जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी प्रकाश भांदक्कर यांचेवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रकाश भांदक्कर हे १२ ते १९ जुलै या कालावधीत जिल्ह्यातील बाराही तालुक्यात नगरपरिषद ,नगरपंचायत येथे भेट देऊन योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतील. यावेळी ते संबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या या योजनेसंदर्भात समस्याही जाणून घेतील. भांदक्कर १५



जुलै रोजी गडचिरोली, धानोरा व आरमोरी येथे भेट देतील. १६ जुलै रोजी देसाईगंज, कुरखेडा व कोरची, १८ जुलै रोजी चामोशी, मुलचेरा व एटापल्ली, १९ जुलै रोजी अहेरी, भामरागड व सिरोंचा येथे पाहणी करून आपला अहवाल २२ जुलै पर्यंत जिल्हाधिकारी यांना सादर करतील. नागरिकांनी त्यांच्या समस्या भांदक्कर यांना प्रत्यक्ष भेटून किंवा त्यांच्या संपर्क क्रमांक ९४२००४५०३० यावर नोंदवाव्या असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# श्री हनुमान विद्यालय अवसरी ने बालगोपाळांची दिंडी

**इंदापूर । दत्तात्रय गवळी.**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी निमित्त इंदापूर तालुक्यात संत तुकाराम महाराज पालखी चे मोठे स्वागत होत असते, याच पार्श्वभूमीवर इंदापूर तालुक्यातील श्री हनुमान विद्यालयाने बालगोपाळांची संत तुकाराम महाराजांचे दिंडी काढली.


अवसरी विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी विठ्ठल रुक्मिणी चा वेश धारण करून , तसेच शाळेतील मुलींनी नऊवारी साडी नेसून डोक्यावर तुळशी घेऊन तसेच डाळ मृदंग यांच्या गुजरामध्ये व आश्वासोबत पताका हाती घेऊन मोठ्या आनंदाने दिंडी अवसरी गावातून फेरी घेऊन ग्रामपंचायत ऑफिस समोर रिंगण सोहळा करण्यात आला या रिंगण सोहळ्यामध्ये प्रथम आश्वाचे टाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे रिंगण घेण्यात आले या रिंगण सोहळ्यात विद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.यानंतर विशेष म्हणजे भोडल्याचा व फुगडी चा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमामध्ये विद्यालयातील संस्कृती विभाग शिक्षिका अरुणा कवडे व ज्योती लोंढे यांनी सहभाग नोंदवला, या कार्यक्रमासाठी अवसरी गावातील तरुण वर्ग व वृद्ध मंडळी महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाकरिता विद्यालयातील मुख्याध्यापक प्रवीण लोंढे ,सहशिक्षक नाना घळके, तानाजी राऊत, दत्तात्रय गवळी, अरुण रसाळ, अरुणा कवडे , ज्योती लोंढे , शांतिलाल शिंदे पाटील, व शिक्षकेतर कर्मचारी हरिदास कवितके, राजेंद्र पेंडवळे, प्रकाश मगर, अजिंक्य जाधव उपस्थित होते.

# भक्ती सागर येथे प्रशासनाच्या आगाऊ प्लॉटस नोंदणी आवाहनाला दिंडीचालकांचा प्रतिसाद


## भाविकांना ६५ एकर येथे ३७४ प्लॉटचे वाटप

**पंढरपूर**-आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. १७ जुलै रोजी साजरा होत आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी ४९७ मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. दि.१३ जुलै पर्यंत ३७४ प्लॉट तर ६५ एकर शेजारील खुल्या जागेतील १४३ प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे. या ठिकाणी भाविकांना आवश्यक सर्व सुविधा प्रशासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. भक्ती सागर येथील आगाऊ प्लॉटस नोंदणीबाबत प्रशासनाच्या आवाहनाला दिंडी चालकांनी उत्तम प्रतिसाद दिला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

आषाढी यात्रा सोहळ्यासाठी संत ज्ञानेश्वर माऊली व संत तुकाराम यांच्या पालख्यांचे जिल्ह्यात दि. ११ व १२ जुलै रोजी आगमन झाले आहे. तसेच अनेक







संतांच्या पालख्या, दिंड्यांचा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश झाला. पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या वारकरी-भाविकांना पालखी तळांवर, मार्गावर प्रशासनाकडून सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यात्रा कालावधीत पंढरपूरात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये. तसेच त्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी दिडींच्या मुक्कामासाठी भक्ती सागर (६५ एकर) तसेच पंढरपूर शहरालगत नव्याने पाच ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ६५ एकरावर दिंड्या येण्यास सुरुवात झाली असून प्रथम येणाऱ्या दिंड्याना प्राधान्य देण्यात येत आहे.भक्ती सागर (६५ एकर) येथे भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याच शुद्ध पाणी, मुबलक शौचालय, वीज, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र स्वच्छता आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे. भक्ती सागर (६५ एकर ) येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी सेक्टर मॅनेजर म्हणून तहसिलदार सचिन मुळीक यांची नेमणूक करण्यात आली आहे. भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी २४ तास कार्यान्वित असणार आहेत. वारकरी भाविकांनी भक्ती सागर (६५ एकर) व नव्याने ५ ठिकाणी निर्माण करण्यात आलेल्या उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा असे आवहनही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

## मूल येथे पार पडला बचत गटाचा मेळावा

# बचत गटाच्या माध्यमातुन हजारो महीला आत्म निर्भर झाल्याने समाधान वाटते–संतोषसिंह रावत



**मूल । प्रतिनिधी**

महिलांचा आर्थिक विकास होऊन त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कटिबद्ध असून संघटित होऊन बचत गटाची निर्मिती केलेल्या शेकडो महीला बचत गटांना विनातारण कर्जाच्या माध्यमातुन आर्थिक सहकार्य केल्याने आज हजारो महीला आत्मनिर्भर झाल्याचे दिसत असल्याने समाधान वाटते. असे मत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोषसिंह रावत यांनी व्यक्त केले.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मूल, राजोली आणि चिरोली शाखेच्या वतीने आयोजित महिला बचत गट मेळावा व कर्जवाटप कार्यक्रमात संतोषसिंह रावत बोलत होते. स्थानिक श्री माँ दुर्गा मंदिराचे सभागृहात पार पडलेल्या मेळाव्यास बँकेचे संचालक संदीप गड्डमवार, कृषी उत्पन्न बाजार समिती मूलचे सभापती राकेश रत्नावार, क्रांतीज्योती सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष गुरु गुरनुले, उपाध्यक्ष गुरु चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंगल बुरांडे आदी उपस्थित होते. महिला बचत गटाच्या पदाधिकारी पुष्पा कच्चेवार, वैशाली सावसाकडे, प्रणाली मल्लेवार, चंद्रकला सातपुते, आणि कुसुमबाई कोवे आदींच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मेळाव्याचे उद्घाटन झाले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंगल बुरांडे यांनी प्राास्ताविक केले. यावेळी महिला बचत गटाच्या फरहाना शेख, मंदाताई चलावार, नलिनी आडपवार, जयमाला चंदनखेडे या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना बचत गटाला आर्थिक सहकार्य देऊन महिलांना आत्मनिर्भर होण्याची संधी दिली. याबद्दल बँकेच्या संचालक मंडळाचे आभार मानले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर, कृषी उत्पन्न बाजार समिती मूलचे सभापती राकेश रत्नावार, क्रांतीज्योती पत संस्थेचे अध्यक्ष गुरु गुरनुले, संचालक संदीप गड्डमवार यांनी मनोगत व्यक्त करताना बँकेच्या विविध कल्याणकारी योजना व कार्यावर प्रकाश टाकला. मेळाव्यात बचत गटाच्या कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मुल येथील गृहिणी महिला बचत गट आणि सावित्रीबाई महिला बचत गटाच्या पदाधिका–यांचा बँकेचे अध्यक्ष संतोषसिंह रावत व संचालक संदीप गड्डमवार यांचे हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संतोषसिंह रावत यांच्या अध्यक्षीय मनोगतनंतर बँकेच्या मूल शाखेतील ११ राजोली शाखेतील ७ आणि चिरोली शाखे अंतर्गत कार्यरत असलेल्या ७ अश्या एकूण २५ महिला बचत गटांना ८० लाखाचे वर कर्जाचे धनादेश वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन संजय पडोळे यांनी तर विभागीय अधिकारी प्रशांत तोटावर यांनी आभार मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी विभागीय अधिकारी प्रशांत तोटावार यांचे मार्गदर्शनात मूल शाखा व्यवस्थापक मधुकर लेनगुरे राजोली शाखा व्यवस्थापक नरेश पाडेवार आणि चिरोली शाखा व्यवस्थापक भास्कर पांचभाई, निरीक्षक नंदकिशोर मडावी, विनोद वेठे, अनिल सिरस्कर यांचे सह बँकेच्या बचत गटाच्या मार्गदर्शक महिला प्रतिनिधींनी सहकार्य केले.

# ऊर्जाजी महासती यांचे चातुर्मासासाठी मंगल आगमन

## जैन श्वेताम्बर स्थानकवासी श्रावक संघाने केले मंगल आगमन

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील जैन श्वेताम्बर स्थानकवासी श्रावक संघ द्वारा या वर्षी परम तपस्वी ऊर्जाजी महाराज साहब यांच्या चातुर्मासाचे आयोजन महावीर भवन येथे केले आहे.यानिमित्त परम तपस्वी ऊर्जाजी महाराज यांचे दि. १४ ला सकाळी नाचणगाव येथून पुलगाव महावीर भवन येथे सकाळी ९-०५ ला मंगल प्रवेश झाला.



प्रवेश पुर्व पुलगाव आगमन समयी जैन भक्तांनी भगवान महावीर यांचा जोरदार जयघोष केला.शेकडोच्या संख्येने महिला कलश डोक्यावर घेऊन व लाल रंगाची वेषभुषा धारण करून तसेच हातात कलश घेऊन मार्गक्रमण करत होत्या.महावीर भवनामध्ये आगमन पश्चात तपस्वी ऊर्जाजी महाराज साहब यांनी प्रवचन उदबोधन केले. आज चा दिवस अत्यधिक मंगलमय असुन पुलगाव शहरात श्री संघ द्वारे प्रथमच चातुर्मास आयोजन होतं आहे.चातुर्मासाच्या ४ महिन्यात आम्हाला धर्म, ध्यान साधनाबरोबर समायीक, अ्यंबील, उपवास, बेला, तेला, अठाई सारख्या तपस्या करून आपल्या कर्माची निर्जरा करत भगवान महावीरांच्या जियो और जिने दो संदेशाला सार्थक करायचे आहे.गुरुकृपेने आम्हाला नवी ऊर्जा प्राप्त होते.गुरु वर पूर्ण विश्वास ठेवल्याने जीवनाची प्रत्येक परीक्षा पास होण्यास मदत होते.आम्हाला गुरुच्या जवळ जाणे आवश्यक आहे.त्यांचे परम मार्गदर्शन नौका पार करत असते.आपण आपल्या मुलांवर पूर्ण विश्वास ठेवला पाहिजे, ते आपली मूल्ये पुढे घेऊन जातील आणि भगवान महावीरांनी दाखवलेल्या धर्माचा मार्ग प्रशस्त करतील असे मौलिक विचार त्यांनी मांडले.

पुलगाव श्री संघाचे अध्यक्ष प्रफुल्ल बाबू दर्डा यांनी प्रास्ताविक केले, महिला मंडळाने स्वागत स्तवन सादर केले, सिद्ध अनिल नाहटा यांनी मंगलगीत गाऊन सर्वांमध्ये चेतना भरली , संचालन व आभार सचिव शुभकरन सुराणा यांनी केले. मंगल आगमन प्रसंगी पंकज पडधारिया, कांतीलाल लुंकडं, चिमणलाल कोठारी,आनंद लुंकडं, प्रवीण भंसाळी, राजेश भंसाळी, गौतम लुंकडं, प्रदीप दर्डा, अनिल नाहटा, सतीश नाहाटा,गिरीष जैन, शैलेश पासड, सागर बदनोरे, पियुष पोहरे, राजेश पाहाडे, प्रेम प्रकाश पाटणी, बंटी सोनी, प्रमोद काळे, अमित बदनोरे बालू लुंकडं, सुशील भंसाळी,सुरेश झाँझरी, सावरिया मारोठीया,संजय शाह, राजकारण सुराणा, महावीर लुंकडं, किशोर चाणेकर, सिद्धार्थ कोचर,शीतल लुंकडं, बंटी शाह, इत्यादी उपस्थित होते.

## चेतना इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज सरडेवाडी येथे पालखी सोहळा साजरा



**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

चेतना इंटरनॅशनल स्कूल येथे पालखी सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमास चेतना फाउंडेशन चे अध्यक्ष माननीय उदय देशपांडे , सचिव विलास भोसले , खजिनदार सोमनाथ माने तसेच चेतना इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्रिन्सिपल निकिता माने , इन्चार्ज प्रिन्सिपल ,सुधीर करगळ , उपस्थित होते.

या कार्यक्रमाला सकाळी नऊ वाजता सुरुवात झाली कार्यक्रमाच्या सर्वप्रथम मुलांनी दिंडी परिक्रमा घेतली त्यानंतर नामघोषणाच्या गजरामध्ये मोठ्या प्रमाणावर रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला होता या सोहळ्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी आनंदी उत्सवामध्ये सहभाग घेतला व नाचत नाचत हरिनामाचा जप करत पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

त्यानंतर छोट्याशा चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अभंग गवळण पोवाडे तसेच संतांचे महत्त्व व आषाढी वारीचे महत्त्व सांगितले .या पालखी सोहळ्याचे औचित्य साधून अकरावी वर्गातील विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले प्रिन्सिपल निकिता माने मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . टाळ ,मृदंग, विना ,पालखी मोठ्या जल्लोषात पांडुरंगाच्या नामघोशात विद्यार्थ्यांनी पालखी सोहळ्याचा आनंद घेतला तसेच चेतना फाउंडेशन मधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने केली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली सुतार यांनी केले.

# भूमिपूजन झाले पण कामाला मुहूर्तच सापडेना





**सेलू । प्रतिनिधी**

लोकसभेची आचार संहिता लागण्याच्या दोन दिवसा अगोदर ज्या रस्त्याचे भूमिपूजन केले त्या रस्त्याच्या कामाला सुरुवात कधी होणार असा प्रश्न सेलू व घोराड चे नागरिक विचारत आहे.


तत्कालीन खासदार रामदास तडस यांनी घोराड सेलू रस्त्याच्या काही भागाचे खडीकरण व डांबरीकरण यासाठी १० लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला त्याचे ग्राम पंचायत चे पुढाकाराने भूमिपूजन ही खासदार यांनी केले .निवडणुका झाल्या सरकार सत्तेवर आले पण या कामाला अजूनही सुरुवात झाली नाही हे १० लक्ष रुपये येणार की नाही या बाबत सभ्रम निर्माण झाला आहे .ज्या दिवशी या कामाचे भूमिपूजन करण्यात आले त्याच दिवशी सेलू नगर पंचायत चे हद्दीतील विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले ते कामे पूर्ण झाली असताना घोराड येथे केलेल्या भूमिपूजनाच्या सोहळ्याचे काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.या रस्त्याची खस्ता हालत पाहता वाहने चालविणे कठीण झाले आहे.

**घोराड वरून सेलुकडे जाणारा हा अंतर्गत रस्ता असून या रस्त्याने विठ्ठल रखुमाई मंदिरात येणाऱ्या भाविकांची , विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते .पण या रस्त्यासाठी दिलेल्या निधीतून काम होणार की परत जाणार या बाबत शंका निर्माण केली जात आहे.**

# वारंवार खंडीत वीज पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात संपूर्ण तालुकाभर विजेचा लपंडाव सुरू असून दिवसातून पंधरा ते वीस वेळा वीज जात असल्याने व्यावसायिक छोटे दुकानदार इलेक्ट्रिक दुकानदार व संपूर्ण नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे महावितरण ने ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा करावा अशी मागणी नागरिक करीत आहेत.



सध्या पावसाळ्याचे दिवस असून अनेक विषारी जीव जंतूंचा प्रादुर्भाव वाढला आहे. अशातच दिवसा व रात्रीमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. तसेच व्यापारी, छोटे दुकानदार, इलेक्ट्रिक दुकानदार हे वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने त्रस्त आहेत कधी उच्च दाब तर कधी कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे इलेक्ट्रिक उपकरणे जळाल्याने या दुकानदारांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. तर दुसरीकडे वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ग्राहकांना वेळेवर सेवा देता येत नाही याचा परिणाम ही व्यवसायावर होत आहे. एकीकडे महावितरण ने वीज दरात मोठी वाढ करून व्यापारी दुकानदार व गरीब नागरिकांवर दरवाढीचा बोजा वाढवला आहे. तरी ग्राहक नियमित बिले भरतात. परंतु महावितरणचे कर्मचारी विद्युत दुरुस्तीचे कामे करण्याऐवजी विज बिले जमा करण्यासाठी व वसुलीसाठी रोज फिरत असतात. परंतु त्यांच्याकडे वीज सर्विस क्लियर करण्यासाठी वेळ मिळत नसल्याचे दिसून येत आहे. परिसरात बऱ्याच ठिकाणी बऱ्याच महिन्यांपासून विद्युत पोल वाकलेल्या अवस्थेत आहेत तर बरेच ट्रान्सफॉर्मर हे खुल्या अवस्थेत आहेत त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वीज दुरुस्तीची कामे ही पावसाळा येण्याच्या अगोदरच क्लि क्लियर करायची असतात. परंतु महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी याकडे लक्ष दिले नाही. वीज ग्राहकांना नियमित सेवा पुरवणे हे महावितरणचे काम असताना महावितरण मात्र ग्राहकांना त्रास देऊन वेठीस धरत आहे. त्यामुळे वारंवार वीज खंडित होण्याचा त्रास महावितरण ने थांबवावा, अन्यथा वीज ग्राहकांनी महावितरण कार्यालयावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे महावितरण ने ग्राहकांना कोणताही त्रास न होता सेवा पुरवावी अशी मागणी नागरिकांकडून तसेच व्यापारी दुकानदारांकडून होत आहे.

# जन्मशताब्दी वर्ष समारोपीय समारंभ व अर्धाकृती पुतळा अनावरण समारंभ संपन्न

**नागभीड । प्रतिनिधी**

कल्याण शिक्षण संस्था, नागपूर चे संस्थापक अध्यक्ष कैवल्यवासी पंडित डॉ. तु.वि.गेडाम यांच्या जन्मशताब्दी वर्ष निमित्त जन्मशताब्दी समारोपिय समारंभ व अर्धाकृती पुतळा अनावरण व लोकार्पण समारंभ दिनांक १०जुलै रोजी संपन्न झाला.

कैलासवासी पंडित डॉ. तु.वि गेडाम म यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तळोधी (बा ) च्या परिसरात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तर जन्मशताब्दी समारोपीय समारंभ राधाकृष्ण मंगल कार्यालय तळोधी (बा ) येथे संपन्न झाला.

जन्मशताब्दी वर्ष समारोपीय समारंभ व अर्धाकृती पुतळा अनावरण समारंभ च्या अध्यक्षस्थानी उन्मेष तू. गेडाम, अध्यक्ष -कल्याण शिक्षण संस्था, नागपूर हे लाभले होते तर उद्घाटक म्हणून डॉ. श्रीराम कावळे , प्र- कुलगुरू ,गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली हे प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून डॉ. प्रवीण गनलावार , अध्यक्ष- गुरु मां शिक्षण संस्था ,नागपूर तसेच डॉ. आर. एल. रत्नपारखी, उपाध्यक्ष- कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, मालती गेडाम, सरचिटणीस -कल्याण शिक्षण संस्था ,नागपूर हे लाभले होते. तर एस.टी.सेलोकर, अध्यक्ष- कै. पंडित डॉ. तु.वि गेडाम साहेब स्मारक समिती, तळोधी (बाळापुर) हे प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

जन्मशताब्दी वर्ष समारोपीय समारंभ प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ घेण्यात आला. यामध्ये कल्याण शिक्षण संस्थे अंतर्गत विविध शैक्षणिक शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कल्याण शिक्षण संस्था,नागपूर च्या वतीने स्मृतिचिन्ह ,रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावी, इयत्ता बारावी तील गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या तसेच बी.एड विद्याशाखा , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथून मेरिट आलेल्या भगवान श्री श्रीकृष्ण शिक्षण महाविद्यालय तळोधी (बाळापुर) येथिल एकुण ६ गुणवंत मेरीट क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

याच प्रसंगी संस्थेतील विविध शैक्षणिक शाखेतील काही विशिष्ट जबाबदारी पार पाडलेल्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन कल्याण शिक्षण संस्था, नागपूर च्या वतीने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कै. पंडित डॉ. तु.वि.गेडाम यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून डॉ.तु.वि गेडाम यांच्या जीवनावर आधारित आनंदयात्री या विशेष स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

जन्मशताब्दी समारोपिय समारंभ प्रसंगी उद्घाटक डॉ. श्रीराम कावळे , प्र-कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी पंडित डॉ. तु.वि. गेडाम यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला व डॉ.तु.वि.गेडाम यांच्या शैक्षणिक कार्याला अविरत निरंतर चालू ठेवण्याचे आवाहन केले. आणि संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

जन्मशताब्दी वर्ष समारोपीय समारंभ अंतर्गत दिनांक ०९ जुलै २०२४ रोजी अनेक उपक्रम घेण्यात आले यामध्ये स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड , सद्भावना रॅली व विविधांगी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.



# लेकीसाठी बापाचा जीवघेणा प्रवास;तापाने फणफणाऱ्या लेकीला कडेवर घेत नाल्यातून वाट काढत गाठले लाहेरी आरोग्य केंद्र

**आनंद दहागावकर । गडचिरोली**

राज्यातील अतिदुर्गम, आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून रस्ते, नदी-नाल्यावर पुलाचे बांधकाम करून खेड्यापाड्यांना मुख्य रस्त्यांशी जोडण्याचे काम केले जात आहे. याठिकाणी विविध विकास कामांना गती मिळाली असली तरी कंत्राटदारांच्या दिरंगाईमुळे अजूनही बरेच ठिकाणी मुख्य रस्ते, नदी-नाल्यावर पुलाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. परिणामी पावसाळ्यात दुर्गम भागातील नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. नुकतेच १३ जुलै रोजी भामरागड तालुक्यातील बंगाडी गावात ३ वर्षीय मुलीची प्रकृती बिघडल्याने तिच्या वडिलांनी स्वतःचा जीव धोक्यात टाकून लेकीला खांद्यावर घेत तुडुंब भरलेले दोन नाले ओलांडत प्रवास केला होता आणि तिला उपचारार्थ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले होते.

छत्तीसगड सीमेवर वसलेला भामरागड तालुका जंगल, नदी-नाल्यांचा प्रदेश असल्याने हा तालुका 'इंडोमिक झोन' मध्ये मोडतो. त्यामुळे येथे नेहमीच मलेरियाचे रुग्ण आढळून येतात. लाहेरी ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या बंगाडी गावातील रविना पांडू जेट्टी हिला ताप येत असल्याने सकाळच्या सुमारास तिच्या वडिलांनी लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. तिच्या रक्ताचे नमुने घेतल्यावर तिला मलेरिया असल्याचे कळले. त्यामुळे तिला भरती करून तिच्यावर उपचार करणे गरजेचे होते, तसा सल्ला देखील येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. मात्र भरती राहून उपचार घेण्यासाठी पांडू जेट्टी तयार नव्हता. अखेर त्याने दवाखान्यातून पळ काढला. भामरागड तालुक्यात आजही अशीच परिस्थिती आहे.मात्र उपचाराअभावी रविना जेट्टी हिच्या जीवाला धोका संभवला होता. त्यामुळे येथील आरोग्य विभागातील अधिकारी आणि तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावातील प्रतिष्ठीत नागरिक लक्ष्मीकांत गोगामी आणि ग्रामपंचायतचे संगणक परिचालक ज्ञानेश्वर भांडेकर यांनी लाहेरी वरून ६ किलोमीटर अंतरावर असलेले बंगाडी गाव गाठून पांडू जेट्टीची समजूत घालून चिमुकलीला लाहेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ दाखल करण्यासाठी विनवणी केली.त्यांनतर त्या मुलीच्या वडिलांनी होकार देताच बाप लेकीला घेऊन तुडुंब भरलेल्या दोन नाले ओलांडत सायंकाळी ७.३० वाजता त्यांनी लाहेरी गाठले. अखेर रविना जेट्टी या चिमुकलीवर उपचार सुरू असून तिची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. संभाजी भोकरे यांनी दिली आहे.



### राज्याच्या शेवटच्या टोकावरील प्राथमिक आरोग्य केंद्र

**भामरागड तालुक्यातील लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्र हे राज्याच्या शेवटच्या टोकावर व छत्तीसगड सीमेवर असून या प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण ९ उपकेंद्रातील जवळपास ४४ अतिदुर्गम गावांचा समावेश आहे. लाहेरीच्या पुढे वाहणाऱ्या गुंडेनूर नाल्या पलीकडील अनेक गावांचा पावसाळ्यात बाह्य जगाशी संपर्क तुटतो. त्यामुळे या भागात रुग्णवाहिका देखील जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत केवळ रुग्णांनाच नाही तर आरोग्य कर्मचाऱ्यांना देखील तुडुंब भरलेल्या नदी नाल्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. छत्तीसगड राज्यातील रुग्ण देखील अश्याच परिस्थितीत लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी येतात ही शोकांतिका आहे.**

### दोन्ही नाल्यावर पुलाचे काम अपूर्ण

**लाहेरीवरून जवळपास तीन ते चार किलोमीटर अंतरावर गुंडेनुर नाला आहे. हाच नाला पुढे २ किलोमीटर अंतरावरील बंगाडी गावाजवळून वाहतो. सध्या पावसाळा असल्याने हा नाला तुडुंब भरून वाहत आहे. गुंडेनूर येथे मागील दोन वर्षांपासून पुलाचे बांधकाम केले जात आहे. मात्र हे काम अद्यापही पूर्ण होऊ शकलेले नाही आणि बंगाडी येथे बेलीब्रिजचे काम सुरू आहे. मात्र ते देखील अपूर्ण असल्याने गुंडेनुर पलीकडील बहुतांश गावातील नागरिकांना लाहेरी किंवा भामरागड तालुका मुख्यालय गाठण्यासाठी जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. अशाच परिस्थितीत मलेरिया ग्रस्त रविनाला घेऊन तिच्या वडिलांना जीवघेणा प्रवास करावा लागला आहे.**

## आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल सुर्ला येथे कृषिकन्यांमार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन




**वरोरा । प्रतिनिधी**

रावे उपक्रमांतर्गत आनंद निकेतन कृषी महाविद्यालयातील कृषिकन्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी जमिन मशागतीसाठी लागणाऱ्या साधनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांना कृषिकन्यांनी आधुनिक उपकरण वापरण्याचे फायदे,त्यामुळे होणारी वेळेची बचत,त्याची कार्यक्षमता या बद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमाचे आयोजन फाल्गुनी नन्नावरे,वैष्णवी नेरकर,काव्या पडाला,श्रुती पराते रोहिनी मस्के, तनुजा नंदागवळी, नंदिनी नांदे यांनी केले. या उपक्रमासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, रावे प्रभारी डॉ. आर. महाजन, समन्वक डॉ. आर तायडे विषय तज्ञ आर रहाटे,यांचे मार्गदर्शन लाभले.

## मुल येथे शिवसेनेतर्फे सन्मान महिलांचा खेळ पैठणीचा कार्यक्रम

### महिलांनी जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांच्या आयोजनाचे केले कौतुक

**मूल । प्रतिनिधी**

मूल येथे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांच्या मार्गदर्शनात सन्मान महिलांचा खेळ पैठणीचा सन्मान स्त्री कर्तुत्वाचा कार्यक्रम सोहळा भाग्यरेखा सभागृह मुल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.




या कार्यक्रमाचे आयोजक मनस्वी संदिप गिऱ्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ महिला चारूशिला नथूजी आरेकर, अनिता बट्टे , राणी अवजे, माजी नगरसेविका न.पं.मुल रीना महेश हरडे, रीना ठाकरे, शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार व आदी मान्यवर होते.

तर कार्यक्रमात उत्कृष्ट शिक्षिका तथा मुख्याध्यापिका सुनिता बुटे यांचा सत्कार जिजा फोडेशनचे अध्यक्षा मनस्वी संदीप गिऱ्हे,यांनी शाल श्रीफळ व स्मृती चिन्ह देऊन केला.या कार्यक्रमात विविध खेळ घेण्यात आले संगीत खुर्ची,लिंबू चमचा, पोत्या वरील उड्या,दोन पाय उडी, उखाने स्पर्धा व आदी खेळ घेण्यात आले.या मद्ये विविध स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीया विजेत्यांना मानाची पैठणी, नऊवारी साडी, इरकणी पैठणी व सन्माचिन्ह देऊन पारितोषिके देण्यात आले.यावेळी मोठ्या संख्येत महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना महिला आघाडीचे सोनिया डोरलीकर,मीना शंभरकर,

टिना ठाकरे,राधा वर्मा, मीनाक्षी गट्टूवार,सारिका डांगे, भावना डोरलिकर,मिरा नरूले, मैथिली हेडाऊ,पायल देऊळवार,सोनू मोरे व ,आदी मुल,महिला आघाडीच्या पदाधिकारी उपस्थित होते.

## गोंडवाना विद्यापीठ ऑफिसर फोरमच्या अध्यक्षपदी डॉ.सोनुले

**गडचिरोली । विशेष प्रतिनिधी**

१२ जुलै २०२४ स्थानिक रोजी विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र यांच्या सभागृहात गोंडवाना विद्यापीठ ऑफिसर फोरमची आमसभा संपन्न झाली. दुपारी ४ वाजेपासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत चाललेल्या या आमसभेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली. आमसभेतील विषय सूचीनुसार मागील ६ वर्षाचा वर्षनिहाय अहवाल संघटनेचे सचिव डॉ. हेमंत बारसागडे यांनी वाचून दाखविला. मागील पाच वर्षांमध्ये झालेल्या जमाखर्चाचा अहवाल संघटनेचे कोषाध्यक्ष देवेंद्र झाडे यांनी सभेसमोर वाचून दाखविला. आगामी काळामध्ये ऑफिसर फोरम सक्षमपणे कार्य करण्याच्या





उद्देशाने आमसभेमध्ये अनेक विषयावर विचार मंथन करण्यात आले. सन २०२४ ते २०२७ या कालावधीसाठी गोंडवाना विद्यापीठ ऑफिसर फोरमची नवीन कार्यकारणी घोषित करण्यात आली. अध्यक्ष - डॉ .संदेश सोनुले, उपाध्यक्ष - रवींद्र जुनघरी व कु. विजयालक्ष्मी परचाके, सचिव - डॉ. कामाजी देशमुख, सहसचिव - प्रमोद बोरकर, कोषाध्यक्ष - सुभाष देशमुख, कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मेश्राम यांची निवड करण्यात आली. आमसभेमध्ये प्रामुख्याने जितेंद्र अंबागडे, कृष्णा देवीकर, उमेश लिखार, अमोल खोडवे, दिनेश नरोटे व अविनाश पोरडड्डीवार हे उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संदेश सोनुले यांनी आपण सर्वांना सोबत घेऊन संघटनेच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करू असा विश्वास व्यक्त केला.

## ग्राम पंचायत ने केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सेलू । प्रतिनिधी**

गावात जिल्हा परिषदेची शाळा पण पाचवी नंतरचे शिक्षण घेण्यासाठी गिरोली या गावातील विद्यार्थ्यांना १० किमी अंतरावरील शाळेत शिक्षण घेण्यासाठी जावे लागते त्यातही विद्यार्थ्यांनी १० वी व १२ वी मध्ये यश संपादन केले त्या विद्यार्थ्यांचा गौरव ग्रामपंचायतचे वतीने करण्यात आल्याने ग्राम पंचायत ने विद्यार्थ्यांची घेतलेली दखल कौतुकास्पद ठरत आहे.

सेलू तालुक्यातील गिरोली( ढगे)हे गाव झडशी आकोली मार्गावर आहे . ग्राम पंचायत ने ग्राम पंचायत कार्यालयात १० वी व १२ वी मध्ये उतीर्ण विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा भेटवस्तु देऊन सन्मान करण्यात आला व पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन करण्यात आले .त्यावेळी सरपंच चंद्रकांत भोंगाडे, उपसरपंच संतोष तोतडे,सदस्य नितीन ढगे,संगीता लटारे, मनीषा



गावंडे,आश्विनी ढगे,सुवर्णा उरकुडे,आशा भोंगाडे,ग्रामसेवक संतोष शिंदे तसेच शिपाई मोनाली ढगे, रोजगारसेवक नितीन बुधबावरे व गावकरी उपस्थित होते.

यावेळी पूर्वी ढगे, यादवी लटारे, वांशिका गुजरकर , साहिल मडावी, वेदांत पिंपळे, संदेश उरकुडे तर १२ वी त प्रावीण्य प्राप्त पायल ठाकरे,सानिया लटारे कौस्तुब तेलतुंबडे, समीर पिंपळे या विद्यार्थ्यांचा भेट वस्तू देऊन गौरव करण्यात आला.

## त्या शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाई द्यावी-संतोष सिंह रावत

**मुल । प्रतिनिधी**

मुल तालुक्यात शेती हेच उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. शेतकरी व शेतमजूर याला शेतीत राबल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. परंतु मुल तालुक्यातील शेती जंगला लागत लागून असल्यामुळे शेतात काम करीत असतानाच वाघाने शेतकरी व शेतमजूर यांचेवर हल्ला करून ठार केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत.

यामधे पडझरी ,कोसंबी, सुशी दाबगाव, केळझर, नलेश्वर, कांतापेठ, कवळपेठ,जानाला, फूलझरी, डोनी, मुल,अंतरगाव पारडवाही,चीचाळा, करवन,काटवन, मारोडा,भादुर्णी, उसराला, मोरवाही, टेकाडी, इत्यादी गावातील मागील एका वर्षात १९ मानवावर हल्ला करून ठार केल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच रानटी डुकराणे सुद्धा शेतकरी आणि शेतमजूर यांचेवर हल्ला करून अनेक जणांना गंभीर जखमी केले आहे. एवढेच नव्हेतर रानटी डूकराच्या हैदोशाने शेतकऱ्यांच्या शेतातील धान,कापूस, तुरी, लाख, तीळ,या पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे, कर्जबाजारी झाला आहे. तरीदेखील वन विभागाने वाघाचा,रानटी डुकराचा बंदोबस्त करण्यात आलेला नाही, यात वनविभाग अपयशी ठरला आहे. वनातील वन्यप्राणी सुरक्षित आहेत,परंतु मानव अजूनही वन्यप्राण्यांपासून असुरक्षित नाही. याला सर्वस्वी जबाबदार शासन आहे.



मुल तालुक्यातील शेकडो शेतकरी केवळ शेतीच्या उत्पन्नावर आपल्या कुटुंबाचा उदर निर्वाह,मुलांचे शिक्षण, मुलींचा विवाह करीत असतात,परंतु यावर्षी हंगामाच्या सुरवातीलाच वनविभागाने आपल्या वनाला तारेचे कुंपण केले नाही. जंगलाला लागून असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीला तारेचे कुंपण करण्यासाठी शासनाने अनुदानही दिले नाही. असे असताना जंगलातील वाघ,बिबट,अस्वल,रान डुक्कर हे शेताकडे यायला लागले आहेत. त्यामुळे शेतकरी शेतात जाऊन शेती करणे कठीण झाले आहे. कसे तरी धान पेरणी केली,कोणी आवत्या तर कोणी पऱ्हे टाकले आहेत. परंतु आता रोवणी,खत,औषधी फवारणी करायला गेले असता शेतातच आणि शेताजवळ वाघाचे दर्शन झाले.त्यामुळे अनेक शेतकरी वाघाच्या भीतीमुळे शेताकडे जाणेच बंद केले आहे. जर शेतकरी शेतातच गेला नाही,तर शेतीचे उत्पन्न कसे घेणार आणि उत्पन्न घेतले नाही तर कुटुंबीयांचे पालन पोषण,शिक्षण कसे करणार या विवंचनेत शेतकरी सापडले आहेत.असे असताना परत शेतकऱ्यांवर पाऊसाचे नैसर्गिक हल्ले होतच असून नुकतेच शेतकऱ्यांनी पेरणी केली तेव्हापासून सारखा पाऊस येत असल्याने तालुक्यातील व जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर दुष्काळ येण्याचे चिन्ह दिसून येत आहेत. अशा प्रसंगी शासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करीत आहे.करीता शासनाने आपल्या वाघाचा कायम स्वरुपी बंदोबस्त करावा,जेणे करुन शेतकऱ्याला शेती करता येईल, अन्यथा अशा शेतकऱ्यांना शेतीत होणाऱ्या उत्पन्न एवढी नुकसान भरपाई शासनाने शेतकऱ्याला द्यावी,अशी मागणी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व माजी जी.प.अध्यक्ष संतोष सिंह रावत यांनी शेतकऱ्यांच्या वतीने केली आहे.

## मोहरम निमित्त भजन संध्या




**सेलू । प्रतिनिधी**

असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या बापुय्या कावडे महाराज संस्थान मध्ये मोहरम निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्या निमित्त सतीश गोमासे यांच्या संचाच्या वतीने आपली भजनाची सेवा प्रदान केली येथे लोकसंगीत भजन आदी कार्यक्रमाची रेलचेल आहे.

शनिवारी झालेल्या भजन संध्या कार्यक्रमात गायक सतीश गोमासे, सावन लेंडे यांनी आर्गण , तबलावादक सत्यम लेंडे, ढोलक वादक बॉबी कानोजिया, तर निलेश दुधाने यांनी आकटोपड वाजवून संगीताची साथ देत तीन तास चाललेल्या कार्यक्रमात अनेक भजन, अभंग , गौळण या मुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले .

या संस्थान मध्ये सर्वधर्मीय लोक मोहरम साजरा करतात या निमित्त शुक्रवारी महाप्रसादाचा कार्यक्रम असून सात हजाराहून अधिक भाविक महाप्रसादाचा लाभ घेणार आहे. या संस्थान चे अध्यक्ष विलास चांदणंखेडे असून गावातील नागरिक , युवक यांचे सहकार्य असल्याने या कार्यक्रमाला मोठे स्वरूप प्राप्त झाले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .